14 DEC 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सॉफ्टबॉलमधील पिचिंग अचूकपणे समजणार

## महावीर महाविद्यालयातील डॉ. रोहित पाटील यांच्या संशोधनाला पेटंट

कोल्हापूर, ता. १३ : येथील महावीर महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रोहित पाटील यांनी सॉफ्टबॉलमधील बॉल पिचिंग अचूक समजण्यासाठी उपकरण तयार केले आहे. त्यांच्या या संशोधनाला केंद्र सरकारचे पेटंट मिळाले आहे. त्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. पाटील यांनी सॉफ्टबॉलमध्ये बॉल पिचिंग करताना तो बरोबर की चूक, याविषयी संशोधन करून उपकरण तयार केले. त्याच्या वापरातून पिचरने टाकलेला चेंडू बरोबर की चूक, हे पंचांच्या मोबाईलमध्ये दिसणार आहे. यासाठी त्यांनी केलेले संशोधन पेटंटसाठी मंजूर झाले असून, त्यांना त्याचे प्रमाणपत्र मिळाले आहे.



कोल्हापूर : सॉफ्टबॉल खेळातील पिचिंगबाबत केलेल्या संशोधनाला पेटंट मिळाल्याबाबत डॉ. रोहित पाटील यांचा सत्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शेजारी प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे.

प्रत्येक सामन्यात किंवा अटीतटीच्या सामन्यात पंचांची भूमिका निर्णायक ठरते याच गोष्टीवर मात करण्यासाठी या खेळामध्ये स्ट्राइक पीच व बॉल पीचमधील योग्य निर्णय उपकरणाद्वारे होणार असल्याची माहिती डॉ. पाटील यांनी दिली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, केएमसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे उपस्थित होते. डॉ. पाटील यांना ॲड. के. ए. कापसे, सचिव एम. बी. गरगटे, महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांचे प्रोत्साहन लाभले.

### योग्य निर्णय, खेळ वाढीला प्रेरणा

या उपकरणातील सेन्सर आणि कॅमेऱ्याच्या मदतीने मुख्य पंचांच्या हातातील मोबाईलमध्ये आणि संबंधित खेळाच्या मार्गदर्शकांकडे बॉल पिचिंगची माहिती जाणार आहे. त्यामुळे या खेळात अधिक सुस्पष्टता आणि योग्य निर्णय होऊन हा खेळ वाढीस प्रेरणा मिळणार असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

14 DEC 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. रोहित पाटील यांच्या सॉफ्टबॉल खेळातील संशोधनाला पेटंट

। कोल्हापूर : येथील महावीर महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रोहित पाटील यांनी सॉफ्टबॉलमध्ये केलेल्या संशोधनाला भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. त्यानिमित्त शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. पाश्चिमात्य देशांत फार खेळला जाणारा सॉफ्टबॉल व बेसबॉल या खेळामध्ये भारतात अजून म्हणावी तशी प्रगती झाली नाही. पाश्चिमात्य देशात या



खेळामध्ये आधुनिकता दिसून येते. परंतु, भारतात पंचांच्या भूमिकेवर किंवा निर्णयावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. याच गोष्टीवर मात करण्यासाठी स्ट्राईक पिच व बॉल पिचमधील योग्य निर्णय उपकरणाद्वारे होणार आहे. हे उपकरण सेन्सर्स व कॅमेऱ्याच्या मदतीने मुख्य पंचांच्या हातातील मोबाईलमध्ये, तसेच मार्गदर्शकांकडे येणार आहे. याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते डॉ. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. बाबासाहेब उलपे हे उपस्थित होते. डॉ. पाटील यांना आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. के. ए. कापसे, सचिव एम. बी. गरगटे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांचे प्रोत्साहन लाभले.

14 DEC 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा 'दे आसरा'शी करार

## विद्यार्थी प्रशिक्षण, प्रशिक्षकांना प्रशिक्षणासाठी फाउंडेशन मदत करणार : देशपांडे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाशी झालेल्या सामंजस्य करारामुळे दे आसरा फाउंडेशन आता येथील सृजनशील युवकांमध्ये उद्योजकता विकास आणि सामाजिक विकासाशी जोडली जात आहे याचे समाधान वाटते, असे उद्‌गार पुण्याच्या दे आसरा फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद देशपांडे यांनी बुधवारी काढले.

सर्वसामान्य नागरिकांमध्ये उद्योजकता विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करणाऱ्या दे आसरा फाउंडेशनसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला. त्यांवेळी डॉ. देशपांडे बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. देशपांडे म्हणाले की, आंतरविद्याशाखीय उपक्रम राबविण्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. त्यादृष्टीने सर्वसमावेशक उपक्रम, विद्यार्थी प्रशिक्षण आणि प्रशिक्षकांना प्रशिक्षण राबविण्यासाठी फाउंडेशन मदत करील.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठामध्ये दे आसरा फाउंडेशनचे उपक्रम राबविण्यासाठी पोषक वातावरण आहे. सामाजिक समावेशन केंद्रासह दोन बँकांची अध्यासने आहेत. त्यामुळे करारांतर्गत उपक्रमांकरिता आवश्यक बाबींची पूर्तता करून विद्यार्थ्यांना उद्योजकतेविषयी अवगत करण्यासाठी प्रयत्न करता येतील. करारावर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी, आशिष पंडित यांनी स्वाक्षरी केली. डॉ. श्रीकृष्ण महाजन, आशिष पंडित, मनीषा तपस्वी, डॉ. सागर डेळेकर, आदी उपस्थित होते.

14 DEC 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# बांगलादेश निर्मितीने नव्या भू-राजकारणाची सुरुवात

## डॉ. यशवंतराव थोरात : विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातील व्याख्यान

कोल्हापूर, ता. १३ : 'पाकिस्तानशी १९७१ चे युद्ध भारताने जिंकले आणि स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती झाली. ही युद्धाची अखेर होती, मात्र उपखंडातील एका नव्या भू-राजकारणाची सुरुवात होती. हे राजकारण आजतागायत सुरू आहे', असे प्रतिपादन नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'भारत-बांगलादेश संबंध' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आणि पत्रकार श्रीराम पवार, तर राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र भणगे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाले, 'चीन आणि रशिया यांच्या संबंधांमध्ये १९५० पासूनच दुरावा येण्यास सुरुवात झाली होती. त्यातून चीन अमेरिकेच्या अधिक जवळ सरकण्याच्या प्रयत्नात होता.



डॉ. यशवंतराव थोरात.

त्याचप्रमाणे नेहरूंच्या तिसऱ्या जगाच्या नेतृत्वाचे स्थान मिळविण्याचे स्वप्नही चीन पाहात होता. त्याचवेळी अमेरिका साम्यवादाला विरोध करीत भांडवलदारी व्यवस्थेला बळ देत होता. या समग्र पार्श्वभूमीवर बांगलादेशचा पराभव पचवू न शकलेला पाकिस्तान अण्वस्त्र निर्मितीच्या मागे लागला. गवत खाऊ, पण अणुबॉम्ब बनवू, अशी गर्जना भुट्टो करीत होते. यापुढे यदाकदाचित पाकिस्तान युद्धखोरीवर उतरलाच, तर ते चीनच्या पाठबळावरच असेल, हे अगदी स्वच्छ आहे.'

श्रीराम पवार म्हणाले, 'भू-राजकारण हे केवळ युद्धापुरते मर्यादित नसते, तर कायमपणे, सातत्याने जगात उलथापालथ करत असते. मोठे देश जेव्हा आपले भू-राजकारण खेळत असतात, तेव्हा छोटे देश आपले भू-राजकारण पुढे रेटत ते साधून घेण्याच्या मागे असतात. त्यात यशस्वीही होतात, असा जागतिक इतिहास आहे. याचे बांगलादेश हे उत्तम उदाहरण आहे. बांगलादेशचा कोणताही नेता हा पूर्णांशाने धर्मनिरपेक्ष नव्हता. आपले भू-राजकारण साध्य करून घेण्यासाठी धर्मजाणिवांचा जितका लाभ घेता येईल, तितका त्यांनी घेतला आहे.'

राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बाळ पाटणकर, डॉ. अनिता बोडके, रघुनाथ कडाकणे, अश्विनी साळुंखे, ऋषिकेश दळवी, दिलीप पवार आदी उपस्थित होते. मतीन शेख यांनी आभार मानले.

14 DEC 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# बांगलादेश निर्मितीने नव्या भू-राजकारणाची सुरुवात

## डॉ. यशवंतराव थोरात : शिवाजी विद्यापीठात 'भारत-बांगलादेश संबंध'यावर व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पाकिस्तानशी १९७१चे युद्ध भारताने जिंकले आणि स्वतंत्र बांगलादेशची निर्मिती झाली. ही युद्धाची अखेर होती. मात्र, उपखंडातील एका नव्या भू-राजकारणाची सुरुवात होती. हे राजकारण आजतागायत सुरू आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ.यशवंतराव थोरात यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'भारत-बांगलादेश संबंध' या विषयावर



डॉ. थोरात यांचे विशेष व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.रवींद्र भणगे प्रमुख उपस्थित होते.

डॉ.थोरात म्हणाले, पाकिस्तानमध्ये झालेल्या १९७०च्या सार्वत्रिक निवडणुकीत झुल्फीकार अली भुट्टो यांना पराभूत करीत पूर्व पाकिस्तानच्या शेख मुजीबूर रहमान यांच्या अवामी लीगने मोठा विजय मिळविला. बांगला नागरिकांचा हा विजय पाकिस्तानला रुचणारा नव्हता. त्यामुळे त्यांना सरकार स्थापन करण्याची संधी नाकारण्यात आली. पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानमध्ये ऑपरेशन सर्चलाइट राबवित तेथील नागरिकांचे नृशंस हत्याकांड आरंभले. लाखोंच्या संख्येने पीडित निर्वासितांचे लोंढे भारतात दाखल होऊ लागले. भारताने या नागरिकांना अन्न, आसरा, वैद्यकीय मदत आदी दिली. त्यातून ३ डिसेंबर, १९७१ रोजी पाकिस्तानने भारताच्या १२ विमानतळांवर हल्ला केला. ही संधी साधून पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारताने अवघ्या तेरा दिवसांत पूर्व पाकिस्तानचा पाडाव केला आणि स्वतंत्र बांगलादेशची निर्मिती झाली. यापुढे यदाकदाचित पाकिस्तान युद्धखोरीवर उतरलाच, तर ते चीनच्या पाठबळावरच असेल, हे अगदी स्वच्छ आहे, असेही त्यांनी सांगितले. राज्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ.प्रकाश पवार यांनी स्वागत केले, तर मतीन शेख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 DEC 2024
सकाळ



मुरगूड : आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेला विद्यापीठाचा व्हॉलीबॉल संघ.

# आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी व्हॉलीबॉल संघाची निवड

मुरगूड, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व्हॉलीबॉल संघाची निवड झाली असून, हा संघ १४ ते १८ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होणार आहे. स्पर्धा स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे होत आहेत. स्पर्धेसाठी संघासोबत प्रशिक्षक संदीप पाटील, सहायक प्रशिक्षक तथा व्यवस्थापक डॉ. सुनील चव्हाण जाणार आहेत.

संघातील खेळाडू असे : ओंकार लोकरे, विवेक चौगले, सत्यजित शिंदे (मंडलिक महाविद्यालय मुरगूड), विजय खामकर, कृपेश पाटील (दूधसाखर महाविद्यालय, बिद्री), अथर्व तोडकर, विजय पाटील (डी. आर. माने महाविद्यालय, कागल), सौरभ जगदाळे, धीरज पाटील (एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड), विश्वरूप पाटील, आदित्य सदामते (केबीपी कॉलेज, इस्लामपूर), अभिजित कांबळे (अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले), अमन नायकवडे (देवचंद कॉलेज, अर्जुननगर), ऋषिकेश ठमके (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर)